Pravara Rural Education Society's

# Arts, Commerce and Science College, Satral

**Tal. Rahuri, Dist. Ahmednagar- 413711**

Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune.

## Self-Study Report: 2024 (3rd Cycle)




**Criterion-3**

## Research, Innovations and Extension

Key Indicator: 3.4

## Extension Activities

### Metric: 3.4.3 (QnM)

**Number of extension and outreach programs conducted by the institution through organized forums including NSS/NCC with involvement of community during the last five years.**

Submitted to

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL BENGALURU

**3.4.3 Number of extension and outreach programs conducted by the institution through organized forums including NSS/NCC with involvement of community during the last five years**

**News of the Extension and Outreach Programs during the last five years**

**1. National Service Scheme Special Winter Camp**

## सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर उत्साहात



धानोरे : विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभागी झालेले मान्यवर. (छाया : समर्थ वाकचौरे)

सात्रळ : राहुरी तालुक्यातील धानोरे येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच लोणी येथील प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर नुकतेच उत्साहात पार पडले.

'युवकांचा ध्यास- ग्राम, शहर विकास' या ब्रीदवाक्यानुसार आयोजित केलेल्या शिबिरास माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विश्वासराव कडू, ॲड. बाळकृष्ण चोरमुंगे, ॲड. आप्पासाहेब दिघे, बाळासाहेब दिघे, प्राचार्य प्रभाकर डोंगरे, अतांत्रिक विभागाचे संचालक डॉ.प्रदीप दिघे, प्राचार्या डॉ. विद्या वाजे, सरपंच शामू बाळू माळी आदींनी भेट दिली.

शिबिरामधील १५० सहभागी स्वयंसेवकांनी धानोरे, सोनगाव स्मशानभूमी परिसर स्वच्छता केली. श्री स्वामी समर्थ केंद्र, गोरक्षनाथ व धनेश्वर मंदिर परिसर विद्यार्थ्यांनी कचरामुक्त करून वृक्ष लागवड केली. शिबीर काळात आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत व्यक्तिमत्व विकास घडवणारे विचार अमृतवाणी व्याख्यानमालेतून स्वयंसेवकांनी देण्यात आले. विद्यार्थी- विद्यार्थिनींनी शिवार फेरी, ग्रामस्थ भेटी आणि समाज प्रबोधनात्मक उपक्रमातून गावकऱ्यांशी संवाद साधला.

शिबीर अहवाल वाचन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहिदास भडकवाड यांनी केले. विद्यार्थी पुरस्काराची घोषणा कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. निलेश कान्हे यांनी केली. कार्यक्रमाधिकारी प्रा. आर. बी. मोरे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. लतिका पंडुरे आणि डॉ.नवनाथ शिंदे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्या डॉ. जयश्री सिनगर, उपप्राचार्य डॉ. दीपक घोलप, सह कार्यक्रमाधिकारी डॉ. गंगाराम वडीतके, प्रा. गोरक्षनाथ बोर्डे, डॉ. गजानन मांडरे, प्रा. निशा खरात, प्रा. एस. पी. कडू, प्रा. डी. एन. घाणे, कु. सायली हारदे, शुभांगी शिंदे यांनी परिश्रम घेतले.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

## 2. National Service Scheme Special Winter Camp

# सात्रळ महाविद्यालयाचे कानडगावात विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी | सात्रळ

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'माझी वसुंधरा व जलस्रोत संवर्धन' हे मध्यवर्ती सूत्र घेऊन सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर कानडगाव (ता. राहुरी) येथे १२५ स्वयंसेवकांच्या माध्यमातून विविध शाश्वत उपक्रम राबवून उत्साहात झाले.

शिबिराचे उद्घाटन क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे यांच्या प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून झाले. उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सात्रळ महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अॅड. बाळकृष्ण चोरमुंगे, कानडगावचे सरपंच चंद्रभान गागरे हे तर अध्यक्ष म्हणून कानडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब गागरे उपस्थित होते.

शिबिर कालावधीत डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. एस. एम. पाटील, डॉ. दिपाली गायकवाड, प्र. प्राचार्य प्रा.



कानडगाव येथे वृक्षारोपण करताना सात्रळ येथील महाविद्यालयीन विद्यार्थी.

सिनारे, शशिकांत खळवे, प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या दीदी यांनी 'अमृतवाणी' या व्याख्यानमालेत स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

शिबिर काळात कानडगावात स्वच्छता, शेरावली बाबा दर्गा स्वच्छता, स्मशानभूमीतील उंचवट्यांचे सपाटीकरण व वृक्षारोपण करून झाडांची रंगरंगोटी केली. सौर ऊर्जा तसेच गावचा आरोग्य सर्वे करून आरोग्यविषयक जनजागृती उपक्रम राबविले. महिला

जलसंधारण आदी उपक्रम स्वयंसेवक व सात्रळ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी राबवले. शिबीराचा समारोप समारंभ चंद्रभान गागरे यांच्या उपस्थितीत झाला. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक अॅड. आप्पासाहेब दिघे हे उपस्थित होते. यावेळी मधुकर गागरे, नानासाहेब गागरे, सोपान गागरे, दिलीप लोंढे, प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री सिनगर, उपप्राचार्य डॉ. सोमनाथ घोलप, प्रा. दीपक घोलप, प्रा. दिनकर घाणे डॉ. भाऊसाहेब नवले

## 3. National Service Scheme Special Winter Camp

गावात पालक सभा मंजाबापू कोबरणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या पालकसभेस ग्रामसेवक गणेश पाखरे, उपसरपंच विकास कोबरणे, गंगाधर

बाबासाहेब शेटे, विठ्ठल नालकर, राजेंद्र कोबरणे, सुनील कोबरणे, भारत कोबरणे, शरद पावसे, शरद कोबरणे सुवर्णा कोबरणे आदी उपस्थित होते.

ठेवणार, असा निर्णय घेतला. त्यामुळे कोरोना पार्श्वभूमीवर आवश्यक त्या राहणार आहे.


# सात्रळ महाविद्यालयाचे कानडगावात विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी | सात्रळ

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'माझी वसुंधरा व जलस्रोत संवर्धन' हे मध्यवर्ती सूत्र घेऊन सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर कानडगाव (ता. राहुरी) येथे १२५ स्वयंसेवकांच्या माध्यमातून विविध शाश्वत उपक्रम राबवून उत्साहात झाले.

शिबिराचे उद्घाटन क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे यांच्या प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून झाले. उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सात्रळ महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अॅड. बाळकृष्ण चोरमुंगे, कानडगावचे सरपंच चंद्रभान गागरे हे तर अध्यक्ष म्हणून कानडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब गागरे उपस्थित होते.

शिबिर कालावधीत डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. एस. एम. पाटील, डॉ. दिपाली गायकवाड, प्र. प्राचार्य प्रा.





कानडगाव येथे वृक्षारोपण करताना सात्रळ येथील महाविद्यालयीन विद्यार्थी.

सिनारे, शशिकांत खळवे, प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या दीदी यांनी 'अमृतवाणी' या व्याख्यानमालेत स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

शिबिर काळात कानडगावात स्वच्छता, शेरावली बाबा दर्गा स्वच्छता, स्मशानभूमीतील उंचवट्यांचे सपाटीकरण व वृक्षारोपण करून झाडांची रंगरंगोटी केली. सौर ऊर्जा तसेच गावचा आरोग्य सर्वे करून आरोग्यविषयक जनजागृती उपक्रम राबविले. महिला

जलसंधारण आदी उपक्रम स्वयंसेवक व सात्रळ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी राबवले. शिबीराचा समारोप समारंभ चंद्रभान गागरे यांच्या उपस्थितीत झाला. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक अॅड. आप्पासाहेब दिघे हे उपस्थित होते. यावेळी मधुकर गागरे, नानासाहेब गागरे, सोपान गागरे, दिलीप लोंढे, प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री सिनगर, उपप्राचार्य डॉ. सोमनाथ घोलप, प्रा. दीपक घोलप, प्रा. दिनकर घाणे डॉ. भाऊसाहेब नवले


Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

## 4. International Youth Day

4:46 PM

SUNDAY, 25 AUGUST 2019

### सात्रळ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन संपन्न



सात्रळ/प्रतिनिधी
बाबासाहेब वाघचौरे

येथील लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानीत) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व लोणी ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात रेड रिबन क्लबचे उद्घाटन करण्यात आले. या क्लब अंतर्गत आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्ताने लोणी ग्रामीण रुग्णालयाचे आरोग्य समुपदेशक श्री संतोष उबाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना एच. आय. व्ही. एड्स व तरुणांमधील लैंगिक आजाराविषयी असणारे अज्ञान या विषयी मौलिक मार्गदर्शन करून जागृत केले.

या कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती जयश्री सिनगर यांनी स्वयंसेवकांना भारत देशाच्या विकासातील तरुणाची भूमिका कशी असावी व तरुण कसा सशक्त राहिला पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्य व स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. समन्वयक प्रा. रोहीत भडकवाड यांनी केले तर आभार प्रा. प्रशांत हराळे यांनी मानले.

Posted by TejNewsHeadlines at 07:30:00

No comments:

Post a Comment

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**5.** ***Jalshakti Abhiyan***

पुढारी

# सात्रळ महाविद्यालयात 'जलशक्ती अभियान'

**धानोरे : वार्ताहर**

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत जलशक्ती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्या श्रीमती जयश्री सिनगर तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जी.एम. पोंधे, तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रंगनाथ दिघे, कारभारी डुक्रे आदी हजर होते

भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या संपूर्ण भारत देशामध्ये जलशक्ती अभियान राबविण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांनी विविध उपक्रमाचे आयोजन केले होते. त्यामध्ये सात्रळ गावात जलसाक्षरता व वृक्ष दिंडीचे आयोजन केले. तसेच मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी डॉ. पोंधे यांनी वृक्षारोपण व जल संवर्धन या विषयावर व्याखान दिले. प्रास्ताविक प्रा.आर एस भडकवाड, सूत्रसंचालन प्रा. पंडूरे लतिका यांनी केले .

**6.** ***Jalshakti Abhiyan***

धान मागवून घतला. जिल्हा बा. यू. चौधरी, दुसरे वरिष्ठ जी. कडक, एम. के. वाखुरे, आवाहन केले.

# सात्रळच्या विखे महाविद्यालयात जलशक्ती अभियान



सात्रळ (वार्ताहर) - लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ, येथे ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नियोजित उपक्रमातील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत जलशक्ती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्या जयश्री सिनगर होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जी. एम. पोंधे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रंगनाथ दिघे, घोलप, कारभारी डुक्रे उपस्थित होते.

भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या संपूर्ण भारत देशामध्ये जलशक्ती अभियान राबविण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांनी विविध उपक्रमाचे आयोजन केले. सकाळी १० वा. सात्रळ गावात सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक यांनी जलसाक्षरता व वृक्षदिंडीचे आयोजन केले. यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. एस. भडकवाड यांनी व सूत्रसंचालन प्रा. पंडुरे लतिका यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. घोलप डी. एन. प्रा. हाळे पी. एल., प्रा. दिघे व्ही. एल. यांनी परिश्रम घेतले.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**7. *Jalshakti Abhiyan***

4:47 PM 4G 74%

FRIDAY, 2 AUGUST 2019

सात्रळ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत "जलशक्ती अभियान" कार्यक्रमाचे आयोजन –




सात्रळ/ प्रतिनिधी
बाबासाहेब वाघचौरे

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील(पद्मभूषण उपाधिने सन्मानीत ) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ, येथे मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे वाढदिवसानिमित्त नियोजित उपक्रमातील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत "जलशक्ती अभियान" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती जयश्री सिनगर या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ पोंधे जी.एम. विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र , पी.व्ही पी कॉलेज लोणी हे होते तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. रंगनाथ भिकाजी दिघे पा. पोलिस व पंचक्रोशीतील जेष्ठ ग्रामस्थ मा. कारभारी डुक्रे हे उपस्थित होते.

भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या संपूर्ण भारत देशामध्ये जलशक्ती अभियान राबविण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालयात रासेयो स्वयंसेवकांनी विविध उपक्रमाचे आयोजन केले त्यामध्ये दि.२७ जुलै २०१९ रोजी सकाळी १० वा.सात्रळ गावात सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी प्राध्यापक यांनी जलसाक्षरता व वृक्ष दिंडी चे आयोजन केले व दि.३० जुलै २०१९ रोजी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. रंगनाथ भिकाजी दिघे पा. व पंचक्रोशीतील जेष्ठ ग्रामस्थ मा. कारभारी डुक्रे व गावातील ग्रामस्थ यांच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले व डॉ पोंधे जी.एम. यांनी वृक्षारोपण व जल संवर्धन या विषयावर व्याख्यान देऊन हे किती गरजेचे आहे. या बाबत उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक यांना उपक्रमशील बनण्यास सांगितले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.आर एस भडकवाड यांनी व सूत्रसंचालन प्रा.पंढुरे ललिका यांनी केले या कार्यक्रमासाठी साठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.सिनगर मॅडम, उपप्राचार्य डॉ.घोलप डी एन, प्रा.हराळे पी.एल , प्रा. पंढुरे ललिका प्रा.दिघे व्ही एल यांनी परिश्रम घेतले सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापकेतर सेवक विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

Posted by TejNewsHeadlines at 01:49:00

No comments:

Post a Comment

Enter your comment...

**8. Flood Relief Fund**

# पूरग्रस्तांसाठी मदत फेरीचे आयोजन

लोकवेध । प्रतिनिधी

**कोल्हार :** येथील कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूर सांगली येथे नुकत्याच आलेल्या भीषण महापूर परिस्थितीने ज्यांचे संसार उद्ध्वस्त झाले, अशा पूरग्रस्तांसाठी मदत फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिंगोटे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हारच्या महाविद्यालयाने या मदतफेरीचे आयोजन केले होते. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या मदत फेरीत एकूण २४,५०० फेरीत एकूण एवढा निधी जमा केला. प्राचार्य डॉ. शिंगोटे सर यांनी हा निधी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाकडे सुपूर्द करण्याचे मत व्यक्त केले आहे.

यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. तुपे व विद्यार्थी कल्याण समितीचे चेअरमन यांनी परिश्रमपूर्वक महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना एकत्रित करून त्यांना निधी संकलन करण्याचे आवाहन केले. पूरग्रस्त लोकांच्या दैनंदिन समस्या वाढत आहेत. आपणही सामाजिक उत्तरदायित्व म्हणून या कार्यात सढळ हाताने यथाशक्ती



मिळेल तेवढी देणगी गोळा करा, असे आवाहन केल्यानंतर विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तप्रिय वर्तन दाखवून कोल्हार परिसरात विविध व्यावसायिकांकडून हा निधी वेगवेगळ्या बॉक्समधून गोळा केला. नंतर हा निधी महाविद्यालयाचे प्राचार्य शिंगोटे यांच्यासमक्ष एकत्रित करण्यात आला. तो निधी मोजण्याचे कार्य महाविद्यालयाचे अकाउंट विभाग प्रमुख शेख व त्यांचे सहकारी तसेच विविध प्राध्यापक यांच्या सहकार्याने करण्यात आले. हा निधी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाकडे सुपूर्द करण्यात येईल, असे डॉ. शिंगोटे यांनी सांगितले.

Arts, Commerce & Science College • ACSC SATRAL • Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

## 9. Flood Relief Fund



4:46 PM 4G 75%

WEDNESDAY, 14 AUGUST 2019

सात्रळ महाविद्यालयातील रासेयो मार्फत पूरग्रस्तांना मदतीचा हात

सात्रळ/प्रतिनिधी
बाबासाहेब वाघचौरे

- लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधिने सन्मानित ), प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ, येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने पश्चिम महाराष्ट्रात आलेल्या अतिवृष्टीमुळे महापूर येऊन हजारो लोक बेघर झाले त्यांना माणुसकीच्या नात्याने राष्ट्रकल्याणासाठी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या ब्रीद वाक्याप्रमाणे माझ्यासाठी नाही तर तुमच्या साठी या हेतूने महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी कोल्हापूर व सांगली भागातील पूरग्रस्तांना मदत व्हावी यासाठी सात्रळ गावामध्ये मदत फेरी काढून रोख स्वरूपातील निधी तसेच अत्यावश्यक वस्तूचे संकलन करून सदर निधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयामार्फत पूरग्रस्तांना मदत पाठवली जाणार आहे.

प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती.जयश्री सिनगर व उपप्राचार्य प्रा. दिपक घोलप, तसेच रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. रोहित भडकवाड, प्रा. प्रशांत हराळे, प्रा. लतिका पंडूरे, तसेच महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवकांचे मौलिक सहकार्य लाभले.

Posted by TejNewsHeadlines at 20:17:00

No comments:

Post a Comment

Enter your comment...

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**10. National Service Scheme Special Winter Camp**

# कानडगावच्या शिबिरात सात्रळच्या विद्यार्थ्यांचे श्रमदान



सात्रळ (वार्ताहर)– सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने माझी वसुंधरा व जलस्रोत संवर्धन हे मध्यवर्ती सूत्र घेऊन सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर कानडगाव (ता. राहुरी) येथे १२५ स्वयंसेवकांच्या माध्यमातून विविध शाश्वत उपक्रम राबवून उत्साहात संपन्न झाले.

यावेळी सात्रळ महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष ॲड. बाळकृष्ण चोरमुंगे, कानडगावचे माजी सरपंच चंद्रभान गागरे तर अध्यक्ष म्हणून कानडगाव येथील नानासाहेब गागरे उपस्थित होते. शिबिर कालावधीमध्ये डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. एन. एम. पाटील, डॉ. दिपाली गायकवाड, प्र. प्राचार्या प्रा. डॉ. जयश्री सिनगर, मनोहर महाराज सिनारे, शशिकांत साळवे, प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाच्या दीदी यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

शिबिर काळात कानडगावामधील रस्त्याच्या दुतर्फा स्वच्छता, शेरावली बाबा दर्गा स्वच्छता, स्मशानभूमीतील उंचवट्यांचे सपाटीकरण व वृक्षारोपण करून झाडांची रंगरंगोटी केली. सौर ऊर्जा तसेच गावचा आरोग्य सर्वे करून आरोग्यविषयक जनजागृती उपक्रम राबविले.

शिबिराचा समारोप चंद्रभान गागरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक ॲड. आप्पासाहेब दिघे उपस्थित होते. याप्रसंगी मधुकर गागरे, नानासाहेब गागरे, सोपान गागरे, दिलीप लोंढे, प्रभारी प्राचार्या डॉ. जयश्री सिनगर, उपप्राचार्य डॉ. सोमनाथ घोलप, प्रा. दीपक घोलप, प्रा. दिनकर घाणे, डॉ. भाऊसाहेब नवले उपस्थित होते.

शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रा. रोहित भडकवाड, प्रा. निलेश कान्हे, प्रा. विकास दिघे, प्रा. लतिका पंडुरे, प्रा. एस. पी. कड्डु, डॉ. अमित वाघमारे व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

ACSC SATRAL
Arts, Commerce & Science College
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

## 11. National Service Scheme Special Winter Camp



व नारायणराव बोरावके कॉलेज केलेल्या विविध उपक्रमाची माहिती

# सात्रळ महाविद्यालयाचे रासेयो श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

सात्रळ (वार्ताहर)–राहुरी तालुक्यातील धानोरे येथे सात्रळ येथील लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच लोणी येथील प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने धानोरे येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर नुकतेच पार पडले.

'युवकांचा ध्यास- ग्राम शहर विकास' या ब्रीदवाक्यानुसार आयोजित केलेल्या शिबिराचे उद्घाटन पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विश्वासराव कडू, ॲड. बाळकृष्ण चोरमुंगे, ॲड. आप्पासाहेब दिघे प्राचार्य डॉ. प्रभाकर डोंगरे, प्राचार्य डॉ. प्रदीप दिघे, प्राचार्या डॉ. विद्या वाजे, सरपंच शामू बाळू माळी यांच्या हस्ते झाले.

शिबिरामधील १५० सहभागी स्वयंसेवकांनी धानोरे, सोनगाव स्मशानभूमी परिसर स्वच्छता केली. श्री स्वामी समर्थ केंद्र, गोरक्षनाथ व धनेश्वर मंदिर परिसर कचरामुक्त करून वृक्षलागवड केली.

शिबिर काळात आयोजित व्याख्यानमालेत व्यक्तिमत्व विकास घडवणारे विचार अमृतवाणी व्याख्यानमालेतून स्वयंसेवकांना देण्यात आले. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिवार फेरी, ग्रामस्थ भेटी आणि समाज प्रबोधनात्मक उपक्रमातून गावकऱ्यांशी संवाद साधला.

समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील उपस्थित होते. यावेळी श्री. म्हस्के म्हणाले, विद्यार्थी जीवनात निश्चित ध्येय असावे. बोलण्याची कला अवगत करा. नाविन्याचा ध्यास धरा. विद्यार्थी जीवनात स्वयंशिस्त गरजेची असून गुणवत्ता महत्त्वाची आहे.

अध्यक्षस्थानी प्रवरा सहकारी बँकेचे संचालक प्रा. बाळासाहेब दिघे होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रभाकर डोंगरे यांनी केले. शिबीर अहवाल वाचन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहिदास भडकवाड यांनी केले. विद्यार्थी पुरस्काराची घोषणा प्रा. डॉ. निलेश कान्हे यांनी केली. प्रा. आर. बी. मोरे यांनी आभार मानले.

Arts, Commerce & Science College
ACSC
SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**12. World Womens Day**



# नारीशक्तीच्या शोभायात्रेने सात्रळ दुमदुमले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवेशद्वारी : जागतिक महिला दिनानिमित्त सात्रळ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी पंचक्रोशीत शोभायात्रा काढून 'कन्या स्वागत स्त्री जन्माचे' पथनाट्य चौकाचौकात सादर करून ग्राम प्रबोधन केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सात्रळ (ता. राहुरी) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील महिला सबलीकरण कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शोभायात्रा आणि पथनाट्य सादरीकरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपप्राचार्य डॉ. दीपक घोलप, प्रा. दीनकर घाणे, डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. भाऊसाहेब नवले, डॉ. अनंत केदारे, डॉ. गंगाराम वडीतके, प्रा. राहुल कडू उपस्थित होते.

यावेळी सात्रळ बस स्थानक, स्टेट बँक व बाजार तळ परिसर येथे झांज व ढोल पथक, विद्यार्थिनी पद्यात्रात 'कन्या स्त्री जन्माचे स्वागत' या पथनाट्याच्या माध्यमातून लोकजागर करण्यात आला.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी महिला सबलीकरण कक्षाच्या समन्वयक उपप्राचार्या डॉ. जयश्री सिनगर, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहिदास भडकवाड, डॉ. निलेश काळे, प्रा. माधुरी जेजुरकर, प्रा. अश्विनी साळुंके, प्रा. दीप्ती आगरकर, प्रा. स्वाती कडू, प्रा. गौरी क्षीरसागर, प्रा. लतिका पंडुरे, प्रा. सोनाली पारधी, प्रा. प्रियांका गागरे, प्रा. सोनाली मुन्तोडे यांनी परिश्रम घेतले.

**13. Burst of colors in the Divyang (differently-abled) Workshop**



# सात्रळ महाविद्यालयातील दिव्यांग कार्यशाळेत झाली रंगांची उधळण

प्रतिनिधी । सात्रळ

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रंगपंचमीनिमित्त रंगांची उधळण करत सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मिळून दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत आनंदोत्सव साजरा करत एकात्मतेचे दर्शन घडवले. ज्यांना रंगपंचमीचा रंग कोणता आहे हेच माहीत नाही, ते बघण्याची दृष्टीच नाही त्यांच्या जीवनात रंग भरण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने केला.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, निर्भय कन्या उपक्रम व आरोग्य समिती आयोजित (विशेष विद्यार्थी) दिव्यांग कार्यशाळा अभ्यासकांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या कार्यशाळेनंतर रंगांची उधळण करण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. प्रभाकर डोंगरे होते. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहिदास भडकवाड यांनी केले. याप्रसंगी सहशिक्षक ज्ञानेश्वर लोखंडे, सतीश ढेठे, आलम सय्यद, आरोग्य समिती चेअरमन डॉ. राम तांबे, प्रा. बाळ सराफ, डॉ. शिवाजी पंडित, डॉ. रामदास बोरसे, डॉ. नवनाथ शिंदे, प्रा. अश्विनी साळुंके, प्रा. माधुरी जेजुरकर आदी उपस्थित होते. कार्यशाळेत बाभळेश्वर येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि अंध व कर्णबधिर विभागातील शंभर विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**14. Burst of colours in the Divyang (differently-abled) Workshop**



## सात्रळ महाविद्यालयातील दिव्यांग कार्यशाळेत झाली रंगांची उधळण

प्रतिनिधी | सात्रळ

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रंगपंचमीनिमित्त रंगांची उधळण करत सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मिळून दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत आनंदोत्सव साजरा करत एकात्मतेचे दर्शन घडवले. ज्यांना रंगपंचमीचा रंग कोणता आहे हेच माहीत नाही, ते बघण्याची दृष्टीच नाही त्यांच्या जीवनात रंग भरण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने केला.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, निर्भय कन्या उपक्रम व आरोग्य समिती आयोजित (विशेष विद्यार्थी) दिव्यांग कार्यशाळा अभ्यासकांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या कार्यशाळेनंतर रंगांची उधळण करण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. प्रभाकर डोंगरे होते. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहिदास भडकाव यांनी केले. याप्रसंगी सहशिक्षक ज्ञानेश्वर लोखंडे, सतीश देठे, आलम सय्यद, आरोग्य समिती चेअरमन डॉ. राम तांबे, प्रा. बाळ सराफ, डॉ. शिवाजी पंडित, डॉ. रामदास बोरसे, डॉ. नवनाथ शिंदे, प्रा. अश्विनी साळुंके, प्रा. माधुरी जेजुरकर आदी उपस्थित होते. कार्यशाळेत बाभळेश्वर येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि अंध व कर्णबधिर विभागातील शंभर विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL

**15. Cleanness Drive**

## 'रासेयो' स्वयंसेवकांकडून स्वच्छता

**सात्रळ :** पद्मश्री डॉ. बाळासाहेब विखे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान अंतर्गत सात्रळ परिसरात सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता केली. यामध्ये बसस्थानक, आठवडे बाजार परिसर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि महाविद्यालय परिसराचा कायापालट केला. या कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या जयश्री सिनगर, उपप्राचार्य प्रा. दीपक घोलप, महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे मौलिक सहकार्य लाभले. सदर अभियान यशस्वीतेसाठी रा.से.यो: समन्वयक प्रा. रोहित भडकवाड, प्रा. प्रशांत हराळे, प्रा. वैभव दिघे, प्रा. लतिका पंडूरे, प्रा. दीप्ती आगरकर यांनी परिश्रम घेतले.

दैनिक पुढारी - २६/८/१९

**16. National Service Scheme Special Winter Camp**

## विद्यार्थी जीवनात स्वयंशिस्त गरजेची : माजी मंत्री म्हस्के

धानोरी येथे आयोजित श्रमसंस्कार शिबिर उत्साहात



**17. National Service Scheme Special Winter Camp**



# सात्रळ महाविद्यालयाचे रासेयो श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

सात्रळ (वार्ताहर)–राहुरी तालुक्यातील धानोरे येथे सात्रळ येथील लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच लोणी येथील प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने धानोरे येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर नुकतेच पार पडले.

'युवकांचा ध्यास– ग्राम शहर विकास' या ब्रीदवाक्यानुसार आयोजित केलेल्या शिबिराचे उद्घाटन पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विश्वासराव कडू, ॲड. बाळकृष्ण चोरमुंगे, ॲड. आण्णासाहेब दिघे प्राचार्य डॉ. प्रभाकर डोंगरे, प्राचार्य डॉ. प्रदीप दिघे, प्राचार्या डॉ. विद्या बाजे, सरपंच शामू बाळू माळी यांच्या हस्ते झाले.

शिबिरामधील १५० सहभागी स्वयंसेवकांनी धानोरे, सोनगाव स्मशानभूमी परिसर स्वच्छता केली. श्री स्वामी समर्थ केंद्र, गोरक्षनाथ व खंडेश्वर मंदिर परिसर कचरामुक्त करून वृक्षलागवड केली.

शिबिर काळात आयोजित व्याख्यानमालेत व्यक्तिमत्त्व विकास घडवणारे विचार अमृतवाणी व्याख्यानमालेतून स्वयंसेवकांना देण्यात आले. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिवार फेरी, ग्रामस्थ भेटी आणि समाज प्रबोधनात्मक उपक्रमातून गावकऱ्यांशी संवाद साधला.

समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील उपस्थित होते. यावेळी श्री. म्हस्के म्हणाले, विद्यार्थी जीवनात निश्चित ध्येय असावे. बोलण्याची कला अवगत करा. नाविन्याचा ध्यास धरा. विद्यार्थी जीवनात स्वयंशिस्त गरजेची असून गुणवत्ता महत्त्वाची आहे.

अध्यक्षस्थानी प्रवरा सहकारी बँकेचे संचालक प्रा. बाळासाहेब दिघे होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रभाकर डोंगरे यांनी केले. शिबीर अहवाल वाचन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहिदास घडवजाड यांनी केले. विद्यार्थी पुरस्कारांची घोषणा प्रा. डॉ. निलेश कान्हे यांनी केली. प्रा. आर. बी. मोरे यांनी आभार मानले.

Arts, Commerce & Science College · ACSC SATRAL · Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**18. National Service Scheme Special Winter Camp**



# श्रमदान सर्वश्रेष्ठ..चला एक होऊ या..

## सात्रळ महाविद्यालयाच्या एनएसएस शिबिरातून संदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

राहुरी: तालुक्यातील धानोरे येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच लोणी येथील प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांचे संयुक्त आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर श्रमदान सर्वश्रेष्ठ..चला एक होऊ या.. गावासाठी हा संदेश देत संपन्न झाले.

'युवकांचा ध्यास - ग्राम शहर विकास' या ब्रीदवाक्यानुसार आयोजित केलेल्या शिबिरास माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के. पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष विश्वासराव कड्डू पाटील, ॲड. बाळकृष्ण चोरमुंगे, ॲड. आप्पासाहेब दिघे, बाळासाहेब दिघे, प्राचार्य प्रभाकर डोंगरे, डॉ.प्रदीप दिघे, प्राचार्या डॉ. विद्या-वाजे, सरपंच शामू बाळू माळी आदींनी भेटी देत संवाद साधला. शिबिरामधील १५० सहभागी स्वयंसेवकांनी धानोरे, सोनगाव स्मशानभूमी परिसर स्वच्छता केली. श्री स्वामी समर्थ केंद्र, गोरक्षनाथ व धनेश्वर मंदिर परिसर विद्यार्थ्यांनी कचरा मुक्त करून वृक्ष लागवड केली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्या डॉ. जयश्री सिनगर, दीपक घोलप, गंगाराम वडीतके, प्रा. गोरक्षनाथ बोर्डे, गजानन मांढरे, निशा खरात, एस. पी. कड्डू, डी. एन. घाणे, सायली हारदे, शुभांगी शिंदे यांनी परिश्रम घेतले.

शिबिरात विद्यार्थ्यांनी परिसर कचरामुक्त करून वृक्ष लागवड केली.

**19. Contribution of students during Covid-19 by making of masks and caring of the adopted families**



## सात्रळ महाविद्यालयातील विद्यार्थांनी मास्क तयार करून दत्तक कुटुंबांची घेतली काळजी

## कोरोना विषाणूपासून बचावासाठी सात्रळ महाविद्यालयाकडून विशेष प्रयत्न

[illegible]

ACSC SATRAL
Arts, Commerce & Science College
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**20. Making and Distribution of masks by students in the society during Covid-19**



सात्रळ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मास्क बनवून केले वाटप


...कोरोनाचा प्रादुर्भाव ...ण्यासाठी येथील लोकनेते डॉ. ...साहेब विखे पाटील प्रवरा ... शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य ... विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय ... योजनेच्या स्वयंसेवकांनी स्वतः ... तयार करून दत्तक कुटुंबांना मास्कचे वाटप केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कोरोना आपत्ती व्यवस्थापन कक्ष अंतर्गत केलेल्या सूचनेनुसार महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सामाजिक जाणीव जपत कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपण राहतो, त्या परिसरातील प्रत्येकी १० कुटुंब दत्तक घेऊन त्यांच्यात कोरोना विषयक जनजागृती, सर्वेक्षण करून त्या कुटुंबांना मास्क वाटप केले. परिसरातील कुटुंबांच्या अडचणी जाणून घेऊन प्रशासनामार्फत त्या सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. या कामासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या जयश्री सिनगर, उपप्राचार्य प्रा. डॉ. एन. घोलप, रासेयो समन्वयक प्रा. आर. एस. भडकवाड, प्रा. पी. एल. हराळे, प्रा. वैभव दिघे, सर्व कार्यक्रम अधिकारी परिश्रम घेत आहेत.

ळे व भाजीपाला

मुख्य वीज वाहिनी खालील

**21. Students distributed masks during Covid-19 [Daily Sarvamat-7/5/2020]**



मास्तर म्हणून काम केले.

सात्रळच्या डॉ. विखे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले मास्कचे वाटप

सात्रळ (वार्ताहर)- महाराष्ट्रात वाढत चाललेला करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकार काम करीत असून यामध्ये लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सामाजिक कर्तव्य या नात्याने स्वतः मास्क तयार करून दत्तक कुटुंबांना मास्कचे वाटप केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ करोना आपत्ती व्यवस्थापन कक्षा अंतर्गत केलेल्या सूचनेनुसार महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सामाजिक जाणीव जपत करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपण राहतो, त्या परिसरातील प्रत्येकी १० कुटुंब दत्तक घेऊन त्यांच्यामध्ये करोनाविषयक जनजागृती, सर्वेक्षण करून त्या कुटुंबांना स्वतः मास्क तयार करून वाटप केले. या कामासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या जयश्री सिनगर, उपप्राचार्य प्रा. डी. एन. घोलप, रा.से.यो. समन्वयक प्रा. आर. एस. भडकवाड, प्रा. पी. एल. हराळे, प्रा. वैभव दिघे, सर्व कार्यक्रम अधिकारी, सर्व स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत. या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे महाविद्यालय व्यवस्थापन समितीकडून कौतुक होत आहे.


।। आमचा गाव आमचा विकास ।। स्थापना- दि. ०१/०४/१९६७
...यत कार्यालय गोंडेगाव/म्हसले
ता. नेवासा, जि. अहमदनगर
...ली निविदा सूचना क्र. १/२०१९/२०

**22. Miss Rutvika Tathe (SYBSc) secured the first position in the District Youth Parliament under the Ahmednagar District Branch in the National Youth Parliament's Elocution Competition.**



## सात्रळ महाविद्यालयाच्या ऋत्विका ताठे हिचे यश

**सात्रळ** | येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील द्वितीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी ऋत्विका अविनाश ताठे हिने नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल युथ पार्लमेंटच्या वक्तृत्व स्पर्धेत अहमदनगर जिल्हा शाखेअंतर्गत डिस्ट्रिक्ट युथ पार्लमेंटमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तिची आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धेसाठी ऋत्विका ताठे हिस महाविद्यालयाचे डॉ. नीलेश कान्हे, प्रा. भडकवाड, प्रा. नवले तसेच प्राचार्य सोमनाथ घोलप, उपप्राचार्य दीपक घोलप यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या स्थानिक कमिटीचे सदस्य रमेशराव पन्हाळे, भाजप युवा मोर्चाच्या ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस बिपीन ताठे, प्रवरा ग्रामीण पत्रकार संघ, सात्रळ यांनी अभिनंदन केले.

Arts, Commerce & Science College
ACSC
SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**23. Miss Rutvika Tathe (SYBSc) secured first prize in the National Youth Parliament's Elocution Competition.**



सार्वमत | www.deshdoot.co

महत्वाचे

ऋत्विका ताठेचे वक्तृत्व स्पर्धेत यश

सात्रळ (वार्ताहर)– राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील द्वितीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी कु. ऋत्विका अविनाश ताठे हिने नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल युथ पार्लमेंटच्या वक्तृत्व स्पर्धेत अहमदनगर जिल्हा शाखेअंतर्गत डिस्ट्रिक्ट युथ पार्लमेंटमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. ऋत्विका ताठे हिस महाविद्यालयाचे डॉ. निलेश कान्हे, प्रा. भडकवाड, प्रा. नवले, प्राचार्य सोमनाथ घोलप, उपप्राचार्य दीपक घोलप यांचे मार्गदर्शन मिळाले. ऋत्विका ताठे हिचे यशाबद्दल मान्यवरांनी अभिनंदन केले.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**24. Mr. Shabab Raju Inamdar (SYBSc) NSS Volunteer selected for National Integrity Camp, Dharwad (Karnataka) [21-27/2/2022]**

## शाबाबची राष्ट्रीय शिबिरासाठी निवड

**लोणी : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय एकात्मता शिबिर कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड, येथे होत आहे. या राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सात्रळ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक शाबाब राजू इनामदार हा महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या शिबिरासाठी पुणे विद्यापीठामधून ५ स्वयंसेवक व ५ स्वयंसेविका सहभागी होत आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील,खासदार डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. शिवानंद हिरेमठ, भारत घोगरे, लिलावती सरोदे, नंदकिशोर दळे, प्रा. जयश्री सिनगर, उपप्राचार्य डॉ. सोमनाथ घोलप, उपप्राचार्य दीपक घोलप यांनी अभिनंदन केले आहे.

Arts, Commerce & Science College • ACSC SATRAL • Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**25. Mr. Shabab Raju Inamdar (SYBSc) NSS Volunteer selected for National Integrity Camp, Dharwad (Karnataka) [21-27/2/2022]**

## शादाब इनामदार यांची राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड

**राहुरी: जलभूमी वृत्तसेवा**

-----------

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय एकात्मता शिबिर (छखउ) कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड, कर्नाटक येथे दिनांक २१ ते २७ फेब्रुवारी २०२२ दरम्यान होत आहे. या राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये तालुक्यातील सात्रळ येथील पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक शादाब राजू इनामदार राहणार दाढ बु. हा महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या शिबिरासाठी पुणे विद्यापीठांमधून ५ स्वयंसेवक व ५ स्वयंसेविका सहभागी होत आहेत. महाविद्यालयाच्या दृष्टीने ही अभिमानास्पद बाब असून त्याचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री, अण्णासाहेब म्हस्के, माजी जि.प. अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, युवा नेते मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, महाविद्यालय विकास समितीचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या प्रा. जयश्री सिनगर, उपप्राचार्य प्रो. (डॉ.) सोमनाथ घोलप, उपप्राचार्य प्रा. दीपक घोलप, कार्यक्रम अधिकारी प्रा. रोहित भडकवाड, प्रा.वैभव दिघे व डॉ. नीलेश कान्हे, डॉ. रामदास बोरसे सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले आहे.



Arts, Commerce & Science College
ACSC
SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**26. Mr. Shabab Raju Inamdar (SYBSc) NSS Volunteer selected for National Integrity Camp, Dharwad (Karnataka) [21-27/2/2022]**

द खल

## शाबाब इनामदारची राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड



**सात्रळ** : युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय एकात्मता शिबिर कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड, कर्नाटक येथे दिनांक २१ ते २७ फेब्रुवारी २०२२ दरम्यान होत आहे. या राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये लोकनेते पद्मभुषण डॉ, बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सात्रळ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक शाबाब राजू इनामदार राहणार हा महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या शिबिरासाठी पुणे विद्यापीठांमधून ५ स्वयंसेवक व ५ स्वयंसेविका सहभागी होत आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आ.राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे, युवा खा. डॉ. सुजय विखे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, शिक्षण संचालक लिलावती सरोदे,सहसंचालच नंदकिशोर दळे, महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. जयश्री सिनगर, उपप्राचार्य डॉ. सोमनाथ घोलप, उपप्राचार्य प्रा. दीपक घोलप, कार्यक्रम अधिकारी प्रा. रोहित भडकवाड, प्रा.वैभव दिघे व डॉ. नीलेश कान्हे, डॉ. रामदास बोरसे सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**27. Mr. Shabab Raju Inamdar (SYBSc) NSS Volunteer selected for National Integrity Camp, Dharwad (Karnataka) [21-27/2/2022]**

दिव्य मराठी अहमदनगर सिटी 22-02-2022

## शाबाब इनामदार याची राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड

**प्रतिनिधी** | लोणी

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय एकात्मता शिबिर कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड, कर्नाटक येथे २१ ते २७ फेब्रुवारी २०२२ दरम्यान होत आहे. या राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक शाबाब राजू इनामदार हा विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या शिबिरासाठी पुणे विद्यापीठांमधून ५ स्वयंसेवक व ५ स्वयंसेविका सहभागी होत असल्याची माहिती प्राचार्य जयश्री सिनगर यांनी दिली.

Arts, Commerce & Science College ACSC SATRAL Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**28. Gender Sensitivity Awareness Programme by Women Empowerment Cell [11/2/2022]**

# सात्रळ महाविद्यालयात लिंगभाव संवेदनशीलता जाणीव जागृती उपक्रम

राहुरी : जलभूमी वृत्तसेवा

पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या तालुक्यातील सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे बाया कर्वे स्त्री शिक्षण व संशोधन केंद्राच्या वतीने लिंगभाव संवेदनशीलता जाणीव-जागृती उपक्रमांतर्गत वैविध्यपूर्ण विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. ऑनलाइन आयोजित केलेल्या या व्याख्यानासाठी पुणे येथील बाया कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या सौ. समृद्धी पानसे ह्या प्रमुख व्याख्यात्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. डॉ. जे. आर. सिनगर, उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. एस. एस. घोलप, उपप्राचार्य प्रा. डी. एन. घोलप, उपप्राचार्य प्रा. डॉ. बी. एन. नवले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. एस. भडक्वाड, कार्यक्रम अधिकारी डॉ. एन.एस. कान्हे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. डॉ. जे. आर. सिनगर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तसेच सात्रळ महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रित राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. सौ. समृद्धी पानसे यांनी आपल्या विषयाला सुरुवात करताना काही चित्रफिती दाखवून विद्यार्थ्यांच्या मनातील कल्पना आणि त्यांचे विचार समजून घेतले. शारीरिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये भिन्नता असते. शारीरिक दृष्ट्या असणारे बदल आपण बदलू शकत नाही. परंतु पुरुष आणि स्त्री यांनी रूढीने ठरवून दिल्याप्रमाणेच कामे करावी असे नाही तर प्रत्येकाच्या आवडी निवडी वेगळ्या असू शकतात. याचा विचार करून समोरच्या व्यक्तीकडे बघावे, असे त्यांनी सांगितले. काळानुरूप आता पारंपरिक विचार बदलणे आवश्यक आहे. आपल्या मुद्द्यांच्या स्पष्टीकरणासाठी त्यांनी अनेक उदाहरणे दिली. सदरच्या व्याख्यानात विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन केले. सूत्रसंचालन प्रा. डी. एस. आगरकर यांनी केले. आभार उपप्राचार्य प्रा. डी. एन. घोलप यांनी मानले.

Arts, Commerce & Science College
ACSC
SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**29. Women Health Awareness Programme (Stri Arogyacha Jagar) [18/12/2021]**

9:17 AM

Ahmednagar City ePa...
paperdivyamarathi.bhaskar.com

divyamarathi.com
18, Dec | Ahmednagar City
PAGE 2

सांडगे,प्रकाश काळे, बापू दातरंगे, किरण शेडाळे, विष्णू जाधव, साहिल सय्यद, समीर जागीरदार, बाळासाहेब राऊत, शुभम लोंढे, दत्तात्रय भिंगारदिवे, अमित खामकर आदी उपस्थित होते. आमदार संग्राम जगताप म्हणाले, शेतकरी बांधव गावोगावी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करत असतात. त्यामुळे ही परंपरा पुन्हा एकदा सुरु झाली आहे. त्यामुळे सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बैलगाडा संघटनेने न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिकेमुळे न्याय मिळाला, त्यामुळे मी सर्व संघटनांचा आभारी आहे.

उपाय आहे. या प्रसंगी डॉ. भूषण देसले यांनी गोळ्या कशा घ्याव्या, आपली व परिवाराची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष कैलास मकासरे, देवेंद्र चव्हाण, अमोल वागुल यावेळी उपस्थित होते. संदीप जगताप, राहुल चव्हाण, ज्योती भालेराव यांनी गोळ्या वाटपास मदत केली.

## सात्रळ महाविद्यालयात 'महिला आरोग्याचा जागर' उपक्रम



सात्रळ महाविद्यालयात आयोजित 'महिला आरोग्य जागर' या उपक्रमाला उपस्थित महिला व विद्यार्थिनी.

**प्रतिनिधी** | सात्रळ

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या, सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील महिला सबलीकरण कक्ष, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सात्रळ महाविद्यालयात 'महिला आरोग्य जागर' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रवरा मेडिकल ट्रस्ट अंतर्गत पाथरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्याधिकारी डॉ. स्वाती विखे यांनी विद्यार्थिनींच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींशी प्रश्नोत्तररूपी संवाद साधताना तारुण्यातील आरोग्यविषयक विविध समस्यांचे चर्चेतून निराकरण केले. कार्यक्रमास प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. सोमनाथ घोलप, उपप्राचार्य प्रा. दीपक घोलप, प्रा. दिनकर घाणे, डॉ. भाऊसाहेब नवले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहित भडकवाड उपस्थित होते. यशस्वितेसाठी महिला सबलीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा. लतिका पंडुरे, प्रा. अश्विनी साळुंखे, प्रा. शरयू दिघे, प्रा. दीप्ती आगरकर, अनिता चोरमुंगे, प्रा. छाया पवार, अलका पावडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. माधुरी जेजुरकर यांनी केले.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**30. YOUNG INSPIRATORS NETWORK (YIN): Celebration of YIN Election**

[Young Inspirators Network (YIN) is a voluntary alliance of young citizens striving for positive change within their individual, professional and societal spheres. YIN aims to create a spirited and unified platform that inspires and engages the youth to participate in the critical process of nation building. The unique promise of YIN is to integrate the youth as a dynamic force in nation transformation, ensuring direct outcome through tangible results.]



सकाळ

# यिन निवडणुकीचा जल्लोष

अध्यक्ष- उपाध्यक्षांची मतदानातून निवड; प्रथमच निवडणुकीला सामोरे गेल्याने उत्सुकता

YOUNG INSPIRATORS NETWORK

Arts, Commerce & Science College
ACSC
SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**31. The NSS Unit organised AIDS Awareness Rally [7/12/2021]**



9:09 AM

...divyamarathi.bhaskar.com

divyamarathi.com
7, Dec | Ahmednagar City

PAGE 2

# ात्रळ महाविद्यालयातील 'रासेयो'तर्फे एड्स जनजागृ

**प्रतिनिधी** | सात्रळ

ेथील कला, वाणिज्य व विज्ञान ाहाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा ोजना व रेड रिबन क्लब यांच्या ंयुक्त विद्यमाने सात्रळ गावातून एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. 'रासेयो'च्या ायंसेवकांनी एड्स विषयक घोषणा ेवून आणि जनजागृतीपर फलक ाती घेऊन सात्रळ लोकांमध्ये एड्स आजाराविषयी जनजागृती आणि ाबोधन केले.

एड्स प्रबोधन रॅलीचे उद्घाटन ाभारी प्राचार्य प्रो. डॉ. सोमनाथ ोलप, उपप्राचार्य प्रा. दीपक घोलप, ारपंच सतीश ताठे, प्राथमिक ापकेंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण तांबोळी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी रोहित भडकवाड, डॉ. न कान्हे, प्रा. वैभव दिघे, प्रा. नितीनकुमार पाटील, प्रा. दि घाणे, डॉ. गोरक्ष बोर्डे, प्रा.ल पंडुरे व ग्रामस्थांच्या उपस्थि झाले.

लोणी प्राथमिक आरोग्य के समुपदेशक संतोष उबाळे म्ह एड्स रोगाचे नियंत्रण हे पिढीवर अवलंबून आहे. तर स्वतःचा एड्सपासून बचाव तरच राष्ट्राचा बचाव होऊ श उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्र कौतुक करत अशाच प्र उपक्रम समाजासाठी राबवावे समाजाभिमुख कार्य करावे, संदेश दिला.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL

**32. The NSS Unit organised AIDS Awareness Rally [7/12/2021]**

# सात्रळ महाविद्यालयात एड्स जनजागृती



**लोणी । वीरभूमी –**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या, सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने सात्रळ गावातून एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. रासेयोच्या स्वयंसेवकांनी एड्स विषयक घोषणा देवून आणि जनजागृतीपर फलक आपल्या हातात घेऊन सात्रळ गावातील लोकांमध्ये एड्स आजाराविषयी जनजागृती आणि प्रबोधन केले. याबद्दल सात्रळ पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले.

एड्स प्रबोधन रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सोमनाथ घोलप, उपप्राचार्य दिपक घोलप, सात्रळ गावचे सरपंच श्री. सतीश ताठे, प्राथमिक उपकेंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. परवीण तांबोळी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहित भडकवाड, डॉ. निलेश कान्हे, प्रा. वैभव दिघे, महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. नितीनकुमार पाटील, प्रा. दिनकर घाणे, डॉ. गोरक्ष बोर्डे, प्रा.लतिका पंडुरे व सात्रळमधील ग्रामस्थांच्या उपस्थितीत होते.

यावेळी लोणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे समुपदेशक संतोष उबाळे मार्गदर्शन करतांना म्हणाले की, एड्स रोगाचे नियंत्रण हे तरुण पिढीवर अवलंबून असून तरुणांनी स्वत:चा एड्स पासून बचाव केला तरच राष्ट्राचा बचाव होऊ शकतो. एड्स आजार हा तारुण्याच्या उंबरठ्यावर झालेल्या चुकांमुळे होत असून यामध्ये तरुणांनी विशेष काळजी घेतली पाहिजे.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब नवले यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत अशाच प्रकारचे उपक्रम समाजासाठी राबवावेत व समाजाभिमुख कार्य करावे असा संदेश दिला.

ACSC SATRAL
Arts, Commerce & Science College
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**33. The NSS Unit organised AIDS Awareness Rally [7/12/2021]**

# राष्ट्रीय सेवा योजनेचा एड्स जनजागृती उपक्रम



**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या, सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने सात्रळ गावातून एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. रासेयोच्या स्वयंसेवकांनी एड्स विषयक घोषणा देवून आणि जनजागृतीपर फलक आपल्या हातात घेऊन सात्रळ गावातील लोकांमध्ये एड्स आजाराविषयी जनजागृती आणि प्रबोधन केले. याबद्दल सात्रळ पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले.

एड्स प्रबोधन रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सोमनाथ घोलप, उपप्राचार्य दिपक घोलप, सात्रळ गावचे सरपंच सतीश ताठे, प्राथमिक उपकेंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. परवीण तांबोळी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहित भडकवाड, डॉ. निलेश कान्हे, प्रा. वैभव दिघे, महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. नितीनकुमार पाटील, प्रा. दिनकर घाणे, डॉ. गोरक्ष बोर्डे, प्रा.लतिका पंडुरे व सात्रळमधील ग्रामस्थांच्या उपस्थितीत होते.

यावेळी लोणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे समुपदेशक संतोष उबाळे मार्गदर्शन करताना म्हणाले की, एड्स रोगाचे नियंत्रण हे तरुण पिढीवर अवलंबून असून तरुणांनी स्वतःचा एड्स पासून बचाव केला तरच राष्ट्राचा बचाव होऊ शकतो. एड्स आजार हा तारुण्याच्या उंबरठ्यावर झालेल्या चुकांमुळे होत असून यामध्ये तरुणांनी विशेष काळजी घेतली पाहिजे.

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**34. The NSS Unit organised Covid-19 Vaccination Drive as a social responsibility**




ACSC SATRAL
Arts, Commerce & Science College • Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**35. Organization of Blood Donation Camp by NSS Unit. Hon’ble Principal J. R. Singar offering certificate to Dr. Anil Pawar for donating blood in the camp.**

सकाळ



सात्रळ : कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रक्तदान शिबिरातील रक्तदाते प्रा. डॉ. अनिल पवार यांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करताना प्राचार्य जयश्री सीनगर. समवेत उपप्राचार्य दीपक घोलप, डॉ. निखिल देशपांडे.

# रक्तदान शिबिरास सात्रळ येथे प्रतिसाद

राहुरी, ता. २३ : तालुक्यातील सात्रळ येथे प्रवरा शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी यांच्या विद्यमाने आज (बुधवारी) रक्तदान शिबिर झाले.

राज्यात कोरोना संकटामुळे रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. राज्य सरकार व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्याचे आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद देऊन, सात्रळ महाविद्यालयाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ५० विद्यार्थी, आठ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी भाग घेतला. डॉ. निखील देशपांडे यांनी रक्तदात्यांना रक्तदानाचे महत्व व फायदे सांगून प्रोत्साहित केले.

प्राचार्य जयश्री सिनगर, उपप्राचार्य डी. एन. घोलप, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. रोहित भडकवाड, डॉ. अनिल पवार, प्रा. विनोद पलघडमल, प्रा. लोंढे, प्रा. सुरेश अनाप, कार्यालय प्रमुख महेंद्र तांबे यांच्या हस्ते रक्तदाते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.

Nagar, Nagar-Today
24/12/2020 Page No. 4

Arts, Commerce & Science College
ACSC SATRAL
Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

**36. The blood donation camp received an enthusiastic response**

पुण्य नगरी

# सात्रळ येथील महारक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



सात्रळ : येथे राष्ट्रीय सेवा योजना व प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकार.समर्थ वाकचौरे

**सात्रळ :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ, येथे राष्ट्रीय सेवा योजना व प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराक्तदान शिबीर दि. २३ डिसेंबर २०२० रोजी आयोजित केले होते.

याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या जयश्री सिनगर होत्या. त्यांनी रक्तदात्यांना प्रशस्तीपत्रकाचे वाटप केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डी. एन. घोलप उपस्थित होते. सध्याच्या कोरोना संसर्गामुळे महाराष्ट्र व देशात रक्ताचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकार व पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने रक्ताचा तुटवडा भासू नये म्हणून महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाराक्तदान शिबिराचे आयोजन करण्यास सांगितले होते. त्यामुळे महाविद्यालयात बुधवार दि. २३ डिसेंबर २०२० रोजी सकाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी येथील डॉ. निखील देशपांडे यांनी रक्तदात्यांना रक्तदानाचे महत्व व रक्तदान केल्याचे फायदे समजावून सांगून प्रोत्साहित केले. यावेळी प्रवरा मेडिकल ट्रस्टचे कर्मचारी दिपक याघचौरे, सतीश तांबे, शुभम उंबरकर, भावना कडू, सिस्टर बालिका आर्दींचे सहकार्य लाभले. शिबिरात ५० विद्यार्थी व ८ शिक्षक व शिक्षकेतर सेवक सहभागी झाले.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डी. एन. घोलप व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. रोहित भडकवाड, डॉ. अनिल पवार, प्रा. विनोद पलघडमल, प्रा. लोंढे , प्रा. सुरेश अनाप कार्यालय प्रमुख महेंद्र तांबे व सर्व सेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

ACSC SATRAL — Arts, Commerce & Science College, Tal. Rahuri, Dist. Ahmednagar

Principal
PRINCIPAL
Art's, Commerce & Science College
Satral, Tal.Rahuri, Dist. Ahmednagar.